# 'मेट्रो ३'च्या सीएमआरएस चाचणीला अखेर मुहूर्त

## अग्निशमन विभागाकडून स्थानकांची पाहणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मेट्रो सुरू होण्याची प्रतीक्षा, त्यानंतर उठलेले अफवांचे मोहोळ या सगळ्या गोंधळानंतर अखेर 'मेट्रो ३' च्या सीएमआरएस चाचणीला मुहूर्त मिळाला आहे. पुढील आठवड्यात एमएमआरसीतर्फे 'कमिशनर ऑफ मेट्रो रेल सेफ्टी'कडे (सीएमआरएस) चाचणीसाठी अर्ज केला जाणार आहे. ही चाचणी पार पाडल्यानंतर मेट्रो ३च्या लोकार्पणाचा मार्ग मोकळा होणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या ३३.५ किमी भुयारी मेट्रो मार्गिकेचा आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा तयार असल्याची चर्चा गेले काही महिने सुरू आहे; मात्र ही मार्गिका प्रवाशांसाठी कधी सुरू होणार याबाबत एमएमआरसीकडून काहीही माहिती जाहीर केली जात नव्हती. अजूनही मेट्रो ३ सुरू होण्याबाबत एमएमआरसीने स्पष्ट सुतोवाच केले नसले तरी पुढील आठवड्यात सीएमआरएससाठी अर्ज करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यात ९ गाड्या धावणार आहेत. आंध्रप्रदेशात तयार करण्यात आलेल्या या गाड्या मुंबईत दाखल झाल्या आहेत. पुढील टप्प्यात आणखी २२ गाड्या उपलब्ध झाल्यानंतर कुलाबा ते सीप्झ या मार्गावर एकूण ३१ गाड्या धावणार आहेत. यात २७ स्थानके आहेत. त्यापैकी २६ स्थानके भूमिगत असणार आहेत.

### ९७ टक्के काम पूर्ण

- 'मेट्रो ३'च्या पहिल्या टप्प्याचे ९७ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीने दिली आहे. काही किरकोळ कामे अद्याप शिल्लक आहेत. पहिल्या टप्प्यातील सर्व स्थानकांचे परीक्षण पालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे करण्यात आले आहे. विद्युत यंत्रणा आणि इतर सर्व तंत्रज्ञानविषयक चाचण्या अंतिम टप्प्यात आहेत.

### पहिल्या टप्प्यातील स्थानके

- आरे, सीप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका, आंतरराष्ट्रीय विमानतळ, सहार रोड, स्थानिक विमानतळ, सांताक्रूझ, विद्यानगरी, बीकेसी.